


**Tree Plantation on World Environment Day**



**A Still from Street Play on Superstition Eradication**



**Cleanliness Campaign at College Premises**



**Construction of a Dam on River at the Village of Palshi**



**Hemoglobin Check up Camp**



**N.S.S. volunteers at Kolhapur Extending Helping Hands to Flood Affected People**




**Rally for Save Girl Child**




**Road Safety Campaign**



**A Magic Show for Superstition Eradication**



# श्रीपतराव कदम कॉलेजात मेगा लोकसंख्या पंधरवडा

खंडाळा, ता. १६ : शिरवळ येथील श्रीपतराव कदम महाविद्यालयात जागतिक मेगा लोकसंख्या पंधरवड्यानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

पंधरवड्याचा प्रारंभ लोकसंख्यावाढ रोखण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना शपथ देऊन करण्यात आला. या वेळी शिरवळचे उपसरपंच सुनील देशमुख, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य, आजीव सेवक अप्पासाहेब देशमुख उपस्थित होते. रांगोळी, पोस्टर प्रेझेंटेशन, निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धेचे उद्घाटन झगलवाडीचे सरपंच भरत लिमन, जवळेचे सरपंच अजय भोसले हस्ते, प्राचार्या डॉ. मंजुश्री बोबडे, अंगणवाडी सेविका योगिता ढमाळ, केसुर्डी बचतगटाच्या सोनम मसुगडे यांच्या उपस्थितीत झाले. पथनाट्य स्पर्धेवेळी भोळीचे सरपंच हरिश्चंद्र लिमन, भोळी प्राथमिक शाळेचे रामगुडे, श्याम शेख उपस्थित होते.

विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ एचडीएफसी बँकेच्या शिरवळ शाखेचे व्यवस्थापक शांताराम कांगाने यांच्या उपस्थितीत झाला. त्यांनी लोकसंख्यवाढीचे दुष्परिणाम सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत तंबाखू व्यसनमुक्तीबाबत सामूहिक शपथ घेण्यात आली. या प्रसंगी प्रशांत पांढरपट्टे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. प्राचार्य डॉ. ठोंबरे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमांच्या आयोजनासाठी एन. बी. चव्हाण, कॅप्टन डॉ. राजेंद्र पवार, प्रा. टी. बी. आफळे, प्रा. एस. आर. सूर्यवंशी, प्रा. के. एस. गांगोडे, डॉ. देवकी राठोड, डॉ. मरे, प्रा. डॉ. मनीषा चव्हाण, प्रा. भास्कर रासकर, डॉ. सुभाष आहेर, प्रा. संतोष सांगळे, प्रा. राजेंद्र तांबिले, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेनेच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

शिरवळ : श्रीपतराव कदम महाविद्यालयात पारितोषिक वितरण करताना शांताराम कांगाने. त्या वेळी प्राचार्या डॉ. मंजूश्री बोबडे, कॅप्टन राजेंद्र पवार आदी.

**A News Paper Cutting**